विधानमंडळाच्या फेब्रु. २०१९ च्या (अर्थसंकल्पिय) अधिवेशनात सादर केलेले सन २०१८-१९ चे खर्चाचे पूरक विवरणपत्र

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांकः पुरक-२०१९/प्र.क्र.०६/२०१९/१७स
नवीन प्रशासकीय भवन,मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
तारीख: १३ मार्च, २०१९

वाचा -

1. **शासन परिपत्रक क्रमांकः वित्त विभाग,शासन परिपत्रक,क्र.पूरक-२०१९/प्र.क्र.४१/ अर्थसंकल्प-३, दि. ०८,मार्च २०१९**

शासन निर्णय -

सन २०१८-१९ या वर्षाचे खर्चाचे पूरक विवरणपत्र दिनांक २५ फेब्रुवारी २०१९ रोजी विधानमंडळास सादर करण्यात आले. सदर पुरवणी खर्चास आता विधानसभेने मान्यता दिली आहे. दि. ३१ मार्च, २०१९ रोजी संपणा-या वित्तीय वर्षाच्या विनियोजनामध्ये समाविष्ट करण्यासाठी, पुरवणी विनियोजन विधेयकास मा.राज्यपालांनी संमती दिली आहे.आणि ते महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन अधिनियम, २०१९ (सन २०१९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक-१) म्हणून महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण, भाग-४ दिनांक ०८ मार्च, २०१९ यामध्ये प्रसिध्द करण्यात आले आहे.

२. सोबत जोडलेल्या विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे पूरक मागणीव्दारे एकूण रु.१०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार मात्र) (कार्यक्रमांतर्गत) (अनिवार्य) मंजूर करण्यात आलेल्या तरतुदी सदर विवरणपत्राच्या स्तंभ पाच मधील संबंधीत कार्यान्वयन/नियंत्रक अधिकाऱ्याच्या स्वाधीन करण्यात येत असल्या तरी पुरक मागणीच्या खर्चासंदर्भात संबंधीत योजनांबाबतचे वित्तिय मान्यतेचे आदेश स्वतंत्ररित्या संबंधीत कार्यासनांमार्फत निर्गमित करण्यात येतील.

३. तसेच वित्तीय अधिकाराच्या प्रत्यायोजनानुसार आवश्यक तेथे नियोजन व वित्त विभागाची मान्यता घ्यावी. याचबरोबर पूरक मागणी जर काही अटी व शर्तीच्या अधिनतेने अर्थसंकल्पित करण्यात आली असेल, तर त्या अटींचे विभागस्तरावर पूर्तता करुन घ्यावी व तेवढीच नस्ती वित्त विभागास /नियोजन विभागास संदर्भीत करावी.

४. तसेच पुरक मागण्यांचा निधी ,योजना/उपयोजना/कार्ये इत्यादी वर खर्च करण्यापूर्वी महाराष्ट्र अर्थसंकल्पिय नियमपुस्तिका, वित्तिय अधिकार नियमपुस्तिका, प्रशासकीय मान्यता आदेश व वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय इत्यादी मधील अटी व शर्तीची पूर्तता करुनच खर्च करण्याबाबत दक्षता घ्यावी.

५. पुरवणी विनियोजन अधिनियमानुसार मंजुर झालेल्या पुरक मागण्यांच्या अनुषंगाने आकस्मिकता निधीतुन काढलेला निधी यापुढे आकस्मिकता निधीच्या खाती खर्ची न टाकता, एकत्रित निधीच्या खाती खर्ची टाकण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३१३१०४९२०६२०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SEEMA BABAN JADHAV

Digitally signed by SEEMA BABAN JADHAV
DN: CN = SEEMA BABAN JADHAV, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = CO OPERATION MARKETING AND TEXTILE DEPT
Date: 2019.03.19 15:26:55 +05'30'

(सीमा बबन जाधव)

सहपत्र-वरीलप्रमाणे

अवर सचिव महाराष्ट्र शासन

प्रत- सहपत्रासह माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित-

१. सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. संचालक, वस्त्रोद्योग संचालनालय,महाराष्ट्र राज्य, नागूपर.
३. संचालक,पणन संचालनालय,पुणे
४. महालेखापाल, महाराष्ट्र -१ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परीक्षा)/(स्थानिक निकाय लेखापरीक्षा व लेखा), मुंबई.
५. महालेखापाल, महाराष्ट्र -२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परीक्षा), नागपूर.
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७. निवासी लेखाधिकारी, मुंबई.
८. उप सचिव (श्री.चव्हाण/श्री वळवी/श्री वळंज), सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
९. अवर सचिव (श्री.शिंगटे/श्रीमती घडयाळे) , सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय,मुंबई-३२
१०.कक्ष अधिकारी (११स/१८स/२२ स/२४स/टेक्स-२) सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११.वित्त विभाग, (अर्थसं.३/व्यय-११/अर्थसं.१३). मंत्रालय, मुंबई ३२.
१२.नियोजन विभाग, (का-१४११/का-१४३१) मंत्रालय, मुंबई ३२.
१३.निवडनस्ती १७-स कार्यासन सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय,मुंबई-३२

शासन निर्णय क्रमांक पुरक-२०१९/प्र.क्र.०६/२०१९/दि. १३.०३.२०१९

विषय :- सन २०१८-१९ मधील खर्चाच्या मंजूर पुरक मागण्या(सहकार,पणन व वस्त्रोद्योग) (फेब्रुवारी २०१९ चे अर्थसंकल्पिय अधिवशेन)

(रु.लाखात)

अ. क्र	बाब क्रमांक	पृष्ठ क्रमांक	लेखाशिर्ष	नियंत्रक अधिकारी/ विभाग प्रमुख	कार्यक्रमांतर्गत	अनिवार्य	एकूण	कार्यासन
१	२	३	४	५	६	७	८	९
१	१००	१२२	**मागणी क्रमांक व्ही-२,** २४०६-वनीकरण व वन्यजीवन ०४-वनीकरण व पर्यावरण विकास, १०१-राष्ट्रीय वनीकरण व पर्यावरण विकास कार्यक्रम, (००) (००)(०१)**शाश्वत विकास ध्येय (ध्येय १५ जमीनी वरील सजीव) या करीता वृक्ष लागवड आणि संवर्धन (सहकार)(दत्तमत)** (२४०६ A ४०७) ०२-मजूरी, २१ पुरवठा व सामग्री	सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य पुणे/ सहायक निबंधक, (अंदाज व नियोजन), मुख्यालय ,पुणे	०.०२	०.००	०.०२	२२स
२	१०१	१२२	मागणी क्रमांक व्ही-२, २४०६-वनीकरण व वन्यजीवन ०४-वनीकरण व पर्यावरण विकास, १०१-राष्ट्रीय वनीकरण व पर्यावरण विकास कार्यक्रम, (००) **(००)(०२)शाश्वत विकास ध्येय (ध्येय १५ जमीनी वरील सजीव) या करीता वृक्ष लागवड आणि संवर्धन (वस्त्रोद्योग)(दत्तमत)** (२४०६ A ४१६) ०२-मजरी, २१ पुरवठा व सामग्री	संचालक (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे	०.०२	०.००	०.०२	टेक्स-२
३	१०२	१२३	मागणी क्रमांक व्ही-२, २४०६-वनीकरण व वन्यजीवन ०४-वनीकरण व पर्यावरण विकास, १०१-राष्ट्रीय वनीकरण व पर्यावरण विकास कार्यक्रम, (००) **(००)(०३)शाश्वत विकास ध्येय (ध्येय १५ जमीनी वरील सजीव) या करीता वृक्ष लागवड आणि संवर्धन (पणन)(दत्तमत)** (२४०६ A ४२५) ०२-मजूरी, २१ पुरवठा व सामग्री	संचालक (पणन), पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे	०.०२	०	०.०२	११ स
४	१०३	१२३	**मागणी क्रमांक व्ही-२,** २४२५-सहकार, १०७- सहकारी पत संस्थांना सहाय्य, (०१)(०८) **कांदा उत्पादक शेतक-यांना सहाय्य** (२४२५ १४२१) ३३-अर्थसहाय्य	संचालक (पणन), पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे	०.००	०.०१	०.०१	२४स
५	१०४	१२४	**मागणी क्रमांक व्ही-२,** २४२५-सहकार, १०७- सहकारी पत संस्थांना सहाय्य, (०१)(१६) **राज्यातील अल्पमुदत सहकारी पतसंरचने अंतर्गत (STCCS) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे सक्षमीकरणासाठी सहाय्य** -(२४२५ २५२४)३३ अर्थसहाय्य	सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य पुणे/ सहायक निबंधक,(अंदाज व नियोजन), मुख्यालय ,पुणे	०.०१	०.००	०.०१	१८ स
६	१०५	१२४	**मागणी क्रमांक व्ही-२,** २४२५-सहकार, १०८-इतर सहकारी संस्थांना सहाय्य, (०१)(२२) **महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघास नाफेडमार्फत खरेदी केलेल्या शेतमालाची रक्कम अदा करण्याकरिता येणा-या अनुषंगिक खर्चासाठी अर्थसहाय्य** (२४२५ २४१७) ३३-अर्थसहाय्य	संचालक (पणन), पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे	०.००	०.०१	०.०१	२४स
७	१०६	१२५	**मागणी क्रमांक व्ही-२,** २४२५-सहकार, १९५- सहकारी संस्थांना सहाय्य, (०१)(०४) **महाराष्ट्र राज्य सहकारी पणन संघामार्फत शेतमालाची खरेदी करण्यासाठी लागलेल्या अनुषंगिक खर्चाची रक्कम अदा करण्याकरिता अर्थसहाय्य** (२४२५ २५४२)-३३अर्थसहाय्य	संचालक (पणन), पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे	०.००	०.०१	०.०१	२४स
			एकूण		**०.०७**	**०.०३**	**०.१०**	
			एकूण-सहकार		**०.०३**	**०.००**	**०.०३**	
			एकूण-पणन		**०.०२**	**०.०३**	**०.०५**	
			एकूण-वस्त्रोद्योग		**०.०२**	**०.००**	**०.०२**	
			एकूण सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग		**०.०७**	**०.०३**	**०.१०**	